# दिवाळी अंकांसाठी वाचकांची रांग

## गंभीर-विनोदी अंकांना सर्वाधिक मागणी; ऑडिओ-ई दिवाळी अंकांनाही प्रतिसाद

**पुणे, ता. २३ :** दिवाळीच्या दिवसांत मंदिरापासून सोन्याच्या दुकानापर्यंत अनेक ठिकाणी पुणेकरांची रांग पाहायला मिळाली. तशीच रांग पुस्तकांच्या दुकानांबाहेरही लागली होती, ती दिवाळी अंकांसाठी. गंभीर आणि विनोदी विषयांवरील अंकांना वाचकांची सर्वाधिक मागणी असल्याचे सध्या दिसत आहे. विशेष म्हणजे, असाच प्रतिसाद ई-दिवाळी अंकांना आणि ऑडिओ अंकांनाही मिळत आहे.

दिवाळी अंकांचा वाचक कमी झाला आहे, अशी ओरड सातत्याने होते. मात्र, दर्जेदार दिवाळी अंकांचा प्रभाव अजूनही कायम आहे. त्यामुळेच वाचक पुस्तकांच्या दुकानात जाऊन असे अंक आवर्जून घेताना दिसत आहेत. यंदाही असाच प्रतिसाद बाजारपेठेत आणि वेगवेगळ्या ई-व्यासपीठांवरही जाणवत आहे. त्यामुळे दिवाळी अंकांची उलाढाल यंदा दहा कोटी रुपयांपर्यंत जाईल, असा विश्वास विक्रेत्यांमधून व्यक्त केला जात आहे.

'अक्षरधारा'चे रमेश राठीवडेकर म्हणाले, ''दिवाळी अंकांना एक वलय आहे. ते अजूनही कायम आहे, हेच चित्र यंदाच्या दिवाळीत पाहायला मिळत आहे. अंक दर्जेदार असेल तर वाचक आवर्जून विचारणा करतात. अशा प्रतिसादामुळे 'ऋतुरंग', 'पुरुष उवाच', 'धनंजय', 'आवाज', 'जत्रा', 'दुर्ग' असे कितीतरी अंक बाजारात उपलब्ध नाहीत, अशी सध्याची स्थिती आहे. यासह साहित्य, विनोद, आरोग्य, माहितीपर अंकांना वाचकांकडून चांगली मागणी आहे.''

'बुकगंगा'चे मंदार जोगळेकर म्हणाले, ''दिवाळी अंकांइतकाच ई-दिवाळी अंकांनाही प्रतिसाद आहे. परदेशांत स्थायिक असलेल्या मराठी वाचकांना अंक मिळावेत म्हणून ई-अंक सुरू झाले; पण आता आपल्याकडील नवी पिढीसुद्धा या ई-अंकांमध्ये रमत आहे. त्यामुळे ई-अंकांची परंपराही चांगलीच रुजताना दिसत आहे. ई-वाचकांचा प्रतिसाद दरवर्षी २५ टक्क्यांनी वाढत आहे. 'पुण्यभूषण', 'पुरुष उवाच', 'मित्रांगण' अशा अनेक ई-अंकांना मागणी आहे.''

### दिवाळी अंक ऐकण्याकडेही कल

**'' 'सोशल मीडिया'मुळे नव्या पिढीत ऐकण्याचा आणि पाहण्याचा कल वाढला आहे. याचा विचार करून आम्ही ऑडिओ दिवाळी अंक सुरू केले आहेत. त्या-त्या लेखकाच्या आवाजात वाचकांना आमच्या संकेतस्थळावरून आणि ॲपवरून वेगवेगळे ऑडिओ दिवाळी अंक मोफत डाउनलोड करून घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. दिवाळीच्या सात दिवसांत ३० हजार जणांनी हे अंक मोफत डाउनलोड करून घेतले आहेत,'' अशी माहिती 'बुकगंगा'चे मंदार जोगळेकर यांनी दिली. दिलीप प्रभावळकर, वंदना गुप्ते, अनिल अवचट, संदीप खरे अशा अनेक मान्यवर लेखक- कलावंतांच्या आवाजात हे ऑडिओ अंक आहेत, असेही त्यांनी सांगितले.**

### या अंकांना मागणी

**मौज, अक्षर, शब्ददीप, मोहिनी, माहेर, मेनका, जत्रा, कालनिर्णय, ऋतुरंग, पुरुष उवाच, आवाज, धनंजय, उत्तम अनुवाद, अंतर्नाद, मिळून साऱ्याजणी, अनुभव, उत्तम कथा, कथाश्री, किस्त्रीम, छंद.**